जनकल्याण प्रतिष्ठान संचलित

सरस्वती शिशुवाटिका, कराड,

तालुका: कराड

जिल्हा: सातारा.

माझा नवोपक्रम सन २०२१

# "खेळातून उमगले शब्दभांडार"

नवोपक्रम कर्ता **सौ.शरयू भास्कर माटे**.

**मुख्याध्यापिका, सरस्वती शिशुवाटिका, कराड**.

## स्पर्धकाची माहिती:-

नावः सौ. शरयू भास्कर माटे.

जन्मदिनांकः २३ फेब्रुवारी १९६७.

भ्रमणध्वनी क्रमांकः ९९७५७९८६४२.

ई-मेल ॲड्रेस : sharayumate2302@gmail.com.

कायमचा पत्ताः ६३, शिवाजी हौसिंग सोसायटी, कराड, जिल्हा-सातारा.

शैक्षणिक अर्हताः M. A (मराठी), D. Ed.

एकूण सेवाः २१ वर्ष.

नवोपक्रम विषयः मराठी.

नवोपक्रम शीर्षकः खेळातून उमगले शब्दभांडार


(भाषा विकास, शब्द संग्रह वाढवणे)



# अनुक्रमणिका


| अ. क्र. | नवोपक्रमाच्या पायऱ्या | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | नवोपक्रमाचे शीर्षक | २ |
| २. | नवोपक्रमाची गरज व महत्व | ६ |
| ३. | नवोपक्रमाची उदिष्ट्ये | १० |
| ४. | नवोक्रमाचे नियोजन | १४ |
| ५. | नवोपक्रमाची कार्यपद्धती | २९ |
| ६. | नवोपक्रमाची यशस्विता | ३४ |
| ७. | समारोप | ३५ |
| ८. | संदर्भ सूची व परिशिष्ठे | ३७-३८ |

# फळे ऑनलाइन परिचय वर्ग





# फळे ऑफलाइन परिचय वर्ग










# नवोपक्रमाची गरज व महत्व

## 1. नवोपक्रमाची गरज:-

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात या छोट्या मुलांना आई-वडील व घरातील इतर मोठ्या लोकांचा सहवास मिळत नाही, विभक्त कुटुंब पद्धती व आई-बाबा दोघेही नोकरी निमित्त दिवसभर घराबाहेर असल्यामुळे या मुलांना घरच्यांसोबत राहून स्वतःचा वेळ घालवता येत नाही. तसेच पाळणाघराची निर्मिती या कारणांनी वाढत आहे. मग शाळेची वेळ व पाळणाघराची वेळ एव्हड्याच गोष्टींकडे आई-वडिलांचे लक्ष केन्द्रित असते. या महत्वपूर्ण कारणांमुळे मुलांना रुचेल, पचेल, आवडेल या पद्धतीने शिक्षण कुटुंबामध्येच राहून शिकता येत नाहीत. या वयोगटातील मुलांना नेमके कसे शिक्षण देता येईल या सर्व गोष्टींचा विचार करायला आई-बाबांना वेळच नाही व शाळेच्या चौकटीमधील अभ्यासक्रम व पाळणाघरातील दिवसभराचे वेळापत्रक या गोष्टींमध्ये या छोट्या मुलांची वयाची 0 ते ६ वर्ष कधीच निघून जातात हे कळत नाही. या मुलांना मनाप्रमाणे खेळ खेळता येत नाहीत या वरील चौकटीतून जाताना इतर आजूबाजूला असणाऱ्या गोष्टी मुलांना बघता येत नाहीत त्या समजत नाहीत.

१. ३ ते ६ वयोगटातील मुलांच्या मेंदूचा ८५% इतका विकास होतो. असे अनेक प्रयोगांद्वारे सिद्ध झाले आहे.

वर्तनातील अपेक्षीत बदल म्हणजे शिक्षण - सध्याच्या जीवनपद्धतीमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या विचारांमध्ये बदल घडलेले आहेत. प्रत्येक आई-बाबांच्या मनामध्ये इतर संस्कृतीचा पगडा घट्ट होत चालला आहे. कारण आपल्या संस्कृतीचे ज्ञान कसे आहे, आपल्या मुलांना आपण नेमकेपणाने काय/कोणत्या प्रकारचे शिक्षण देण्याची गरज आहे ह्या गोष्टींचा विचार आत्ताचे आई-बाबा करत नाहीत. इतर करतात म्हणून आपण करायचे हे नक्की एव्हडाच विचार आई-बाबा करतात. प्रथमदर्शनी इंग्रजी शाळांमध्ये आपले मूल घातले की ते खूप हुशार व सुज्ञ होईल असे त्यांना वाटते. म्हणूनप्रथम इंग्रजी शाळेचा पर्याय प्रत्येक पालक

अवलंबत आहे. यातून बालकांचा सर्वांगीण विकास साधेल का? या गोष्टींचा विचार पालक करत नाहीत.

प्रत्येक मूल वेगळे आहे, प्रत्येकाच्या आकलनाच्या कक्षा वेगळ्या आहेत, त्यासाठी लागणारा वेळही वेगळा आहे याचा विचार करून अध्ययन अनुभव देणे आवश्यक आहे आणि यासाठी प्रथम आपल्या भाषेला, आपल्या संस्कृतीला महत्व देऊन मुलांना शिक्षण दिले गेले पाहिजे ह्या गोष्टींचा प्रत्येक पालकांनी विचार केला पाहिजे, शिक्षण दिले गेले पाहिजे म्हणजे पुढे जाऊन आपले मूल हे सुसंस्कारीत होऊन भविष्यात चांगली व्यक्ती बनेल, तसेच मुलांचा शारिरीक, मानसिक, भावनिक, सामाजिक विकास होईल.

२. या वयोगटातील मुलांचा भाषा विकास करण्यासाठी विविध माध्यमांचा तसेच विविध खेळांचा आपण वापर करू शकतो.

३. या वयोगटातील मुलांना वाचन आणि लेखन या क्रिया समजत नाहीत परंतु खेळाच्या माध्यमातून मुले खूप शिकतात व बोलतात.

४. प्रात्यक्षिकांच्या द्वारे खेळ खेळताना मुलांच्यामध्ये झालेले बदल लक्षात आले.

५. या वयोगटातील विद्यार्थ्यांना खेळ अत्यंत प्रिय असतात. घरातील व मैदानावरील खेळ तसेच बैठे खेळ इत्यादी खेळातून मुले आपला विकास साधत असतात व स्वताच्या कल्पकतेने खेळ खेळत असतात.

**२.नवोपक्रमाचे महत्व:-**

१. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पाया शाळेतून रचला जातो.

२. शाळेतून मिळणारे मूल्यशिक्षणावर आधारित शिक्षण मुलांसाठी पुढील जीवनासाठी शैक्षणिक शिदोरी असते. यावरच त्यांची पुढील यशस्विता आवलंबून असते. यावरच देशाचे भवितव्य अवलंबून असते. जे आत्ता या मुलांना देणे गरजेचे आहे. ते ते सर्व शाळेतून आपण देणे व मुलांपर्यंत पोहचविणे महत्वपूर्ण आहे. मग ते अभ्यासातून, गाण्यातून, खेळातून, स्वकृतीतून देणे महत्वाचे आहे. या सर्व गोष्टी शाळेतून विद्यार्थ्यांना

दिल्या तर नक्कीच त्यांच्या बौद्धीक, शारिरीक, मानसिक क्षमतांच्या विकासामध्ये प्रेरक आहेत.

मुलांच्या आरोग्याला पोषक असे अन्नघटक मिळाले नाहीतर मुले कुपोषित राहतात व त्याचे परिणाम त्या मुलांना आयुष्यभर भोगावे लागतात. त्याचप्रमाणे बुद्धिशी सुसंगत शिक्षण मिळाले नाही तर माणसाच्या शिक्षणात, व्यक्तिमत्वात फरक पडतो. व त्याचे परिणाम फार गंभीर व दीर्घकाळ टिकतात. यासाठी बुद्धी सुसंगत शिक्षण देता येईल याचा विचार केला. भारतीय शिक्षण तज्ञांनी खूप सुसंगतपणे व वैविध्यपूर्णपणे विश्लेषण केले आहे.

३ ते ६ हा वयोगट ज्ञानार्जनासाठी महत्वपूर्ण मानला आहे. यासाठी या वयोगटातील मुलांना योग्य व महत्वपूर्ण मार्गदर्शन करणे गरजचे आहे. सर्व मुले यापद्धतीमुळे सर्व शिक्षण घेऊ शकतात. शिक्षण देण्याचे मार्ग कोणतेही असोत, शिक्षणाचा गाभा एकच ठेवून सर्व लक्ष विद्यार्थ्यांवर केन्द्रित करून शिकवणे व योग्य ऊंची गाठण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करणे

३. यावरून सन २०२० ते २०२१ या कालावधीत कोविड-१९ मध्ये ऑनलाइन शिक्षणाशिवाय पर्याय नव्हता. या वयोगटातील मुलांना घरी राहून आनंदी व सुरक्षित शिक्षण देण्यासाठी या नवोपक्रमाचा अवलंब केला.

४. मोबाइलचा वापर योग्य व कमी प्रमाणात करून कृतीयुक्त शिक्षणातून मुलांच्या भाषाविकासासाठी व मुलांचा शब्दसंग्रह वाढविण्यासाठी या नवोपक्रमाचे नियोजन केले.

## नवोपक्रम निवडीचे कारण :-

१. वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांची आवड-निवड वेगळी असते. शाळेत मुलांना पूरक वातावरण निर्मिती करून दिली तसेच ताईनी सुसंवाद करत जवळीक साधली तर ही मुले स्वतःबद्दलचे मत व स्वतःची आवड बोलू लागतात.

२. या वयोगटातील मुलांना खेळातून संधी दिली पाहिजे. त्यांच्या आवडीने त्यांना हवे तसे खेळ खेळण्यास दिले पाहिजेत. गट करून मुलांना विविध खेळ खेळण्यास दिले तर मुले खूप छान पद्धतीने खेळ खेळतात.

३. शैक्षणिक खेळांच्या माध्यमातून विविध फळे,फुले, प्राणी, पक्षी, औषधी वनस्पती, कारागीर इत्यादींचे महत्व विषद करता येते. खेळ खेळताना त्यांची नावे, उपयोग व त्यांचे महत्व सांगता येते. मुले लक्षपूर्वक हे खेळ पाहतात, समजून घेतात व पुन्हा पुन्हा असे खेळ खेळण्यास उत्सुक असतात व यातून विविध गोष्टींची माहिती मुलांना समजण्यास व लक्षात राहण्यास मदत होते.

४. शाळेत विद्यार्थ्यांना वरील सर्व गोष्टींची पूर्तता केल्यामुळे मुलांच्या बौद्धिक, शारिरीक व मानसिक क्षमतांचा विकास होण्यास मदत होते.

# नवोपक्रमाची उद्दिष्टे -

बालशाळेत प्रत्यक्षपणे वाचन, लेखन, गणन अयोग्य आहे, हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य झाले आहे. वरील गोष्टी आत्मसात करण्यासाठी विविध कौशल्यांच्या आधारे देण्यासाठी वाचनपूर्व संकल्पना स्पष्ट करता येतात.

मनोरंजनात्मक व कृतीतून या संकल्पना प्रभावीपणे मुलांना समोर दाखवता येतात. एकदा मुलांशी गप्पा मारताना असे लक्षात आले की काही मुलांना फळे आवडत नाहीत, काही मुले फळे कोणतेही फळ खात नाहीत, तेव्हा असे लक्षात आले की आपण विविध प्रकारच्या फळांची माहिती मुलांना सांगू शकतो, याविषयी मुलांसाठी नवोपक्रम करता येईल असे माझ्या लक्षात आले व मी " **खेळातून उमगले शब्द भांडार**" हा उपक्रम करण्याचे ठरवले.

या खेळातून मुलांचा भाषा विकास साध्य होईल तसेच मुलांच्या **शब्दसंग्रहात** वाढ होईल, या खेळातून निसर्गातून मिळणारी विविध फळे, त्यांचे उपयोग, त्या फळाविषयी सखोल माहिती करून देता येईल. दुसरे म्हणजे यातून मुलांना फळे प्रत्यक्ष दाखवून फळांचा आकार, रंग, चव , लहान-मोठेपणा इत्यादीविषयी मुलांना माहिती सांगणे सोपे झाले.

ही छोटी बालके राष्ट्राची संपत्ती आहेत. आपल्या देशाचा पाया आहेत. हा पाया भक्कम असेल तर देशाची प्रगती चांगली व लवकर होईल. यासाठी या भावी पिढीचे भवितव्य, समाज, शिक्षक व पालक या सर्वांच्या हाती आहे. हा पाया कच्चा असेल तर देशाची प्रगती होऊ शकणार नाही. आणि म्हणून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी मनोरंजनात्मक व कृतीयुक्त हा माझा नाविन्यपूर्ण उपक्रम ठरला.

या उपक्रमातून बालक जेव्हा स्वतः कृती करते तेव्हा ते अधिक ज्ञान प्राप्त करत असते. हे ज्ञान त्याच्या दीर्घकाळ लक्षात राहते. सभोवतालच्या जगाविषयी ते अधिक संवेदनशील बनते. कारण आश्याप्रकारचे शिक्षण त्यांच्या ज्ञानेंद्रियाना चालना देणारे कृतियुक्त शिक्षण आहे.

माझ्या सर्व शिक्षक भगिनींना अध्यापन करताना हा नवोपक्रम निश्चितच उपयोगी पडेल व त्या अध्ययन करताना या नवोपक्रमाचा उपयोग चांगला होईल व त्यांनाही नवोपक्रम करण्याची प्रेरणा मिळेल.

सदर नवोपक्रम हा फळांच्या माध्यमातून असल्यामुळे परिसर, परिचय, फळांची ओळख, विज्ञानुभव, भाषाविकास, वाचनपूर्व व गणनपूर्व सिद्ध होईल. सूक्ष्म स्नायूंचा विकास सर्जनशीलतेचा विकास होईल. म्हणून हा उपक्रम महत्वपूर्ण आहे असे मला वाटते. बालकांना जेव्हडे स्वतंत्रपणे व गटात खेळायची संधी मिळते तेवढीच त्यांच्या सुप्तगुणांची वाढ होते. बालकाला परिसरातील बाबींविषयी अधिक कुतूहल असते. परिसरातील माती, वाळू, दगड, पक्षी, फुले, फळे यांचे आकर्षण असते. त्यामुळे या गोष्टी पाहायला, गोळा करायला त्यांचे वास घेण्यास, त्यांचे आकार बघण्यास खूप आवडते. या साऱ्या गोष्टी डोळ्यांसमोर ठेवून केलेला उपक्रम महत्वपूर्ण वाटतो.

सदर नवोपक्रम शहरी, ग्रामीण, आदिवासी, दिव्यांग अश्या सर्व प्रकारच्या बालकांसाठी उपयोगी असून कोणत्याही प्रकारची सक्ती न करता हसत-खेळत राबिवता येतो म्हणून मला हा नवोपक्रम केल्याचा खूप आनंद होत आहे.

कोरोंनामुळे शाळा बंद, घरी राहून मुले कंटाळून गेली, मग अशावेळी मुलांना आनंददायी प्रेरणात्मक व जिज्ञासापूर्वक शिक्षण प्रवाहात ठेवण्यासाठी हा नवोपक्रम ठरवला.

**नवोपक्रम का करतो -**

- ❖ विद्यार्थ्यांना नव-नविन खेळप्रकारातून ज्ञान देणे.
- ❖ माहिती सांगणे, शब्दसंग्रह वाढवण्यास मदत करणे.
- ❖ वेळेचा सदुपयोग.
- ❖ निवडलेल्या खेळातून मुलांना आवड निर्माण करणे.निवडलेल्या खेळातून मुलांना आवड निर्माण करणे.

**नवोपक्रमाचा फायदा कोणाला :-**

- ❖ या उपक्रमातून प्रत्येक विद्यार्थ्याला संधि मिळाल्यामुळे कल्पनाशक्तीला वाव मिळाला.
- ❖ विद्यार्थ्याला चौफेर लक्षपूर्वक पाहण्याची सवय लागते.
- ❖ निरीक्षण क्षमता वाढल्यामुळे साहजिकच विद्यार्थ्यांमध्ये खेळाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला.

❖ विद्‌यार्थी, पालक व शिक्षकांना

**फायदा कसा  व कोणत्या स्वरूपात**

**विद्‌यार्थ्यांना-**

- ❖ खेळातून शिक्षण झाल्यामुळे मनामध्ये आनंद व शरीरात नवचैतन्य आणि उत्साह निर्माण झाले.
- ❖ विविध खेळांमुळे फळांची नावे, त्यांचे प्रकार,उपयोगिता व महत्व मुलांना समजण्यास सोपे झाले, व मुले सर्व फळे त्यांच्या उपयोगीतेनुसार ओळखू लागली, तसेच फळांची उपयोगिता लक्षात आल्यामुळे विविध फळांचे मागणी करून सेवन करू लागली
- ❖ विद्‌यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून स्वतःच्या कल्पनेप्रमाणे खेळ खेळू लागली.
- ❖ बौद्‌धिक विकास व शब्दसंग्रह वाढीस लागला.
- ❖ विविध फळांचे विषयी खेळ खेळल्यामुळे इतरही विषयांची माहिती खेळांच्या माध्यमातून घेणे सोपे झाले.
- ❖ स्वकृतीला मुलांना वाव दिल्यामुळे खेळांबद्‌दल ज्ञान, प्रेरणा मिळाली.
- ❖ दुसऱ्यांसोबत सहभागी होऊन खेळण्याची सवय होण्यास मदत झाली.

**पालकांना-**

- ❖ या उपक्रमाद्‌वारे मुलांचा वेळ सत्कारणी लावण्यास मदत झाली.
- ❖ फळे, पालेभाज्या, प्राणी, पक्षी, औषधी वनस्पति, फळभाज्या, कडधान्य, वाहने, ग्रह व सणांचे महत्व  ई. गोष्टींची सखोल माहिती मुलांना देण्यास मदत झाली.
- ❖ विविध खेळांच्या माध्यमातून मुलांचा विविध विषयांवरील अभ्यास (सराव) घेण्याचा अनुभव मिळाला.

**शिक्षकांना-**

- ❖ प्रत्येक विध्यार्थ्याला संधि दिल्यामुळे त्यांची वैचारिक व जिज्ञासू वृत्ती लक्षात आली.
- ❖ खेळातून विद्‌यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढवण्यास मदत झाली.

- ❖ स्वकृतीला वाव दिल्यामुळे विद्यार्थ्यामध्ये खेळांबद्दल ज्ञान, जिज्ञासा, प्रेरणा, दुसऱ्यांसोबत एकत्रित सहभागी होऊन मैत्री धृड होण्यास मदत झाली.
- ❖ या उपक्रमाद्वारे मुलांपर्यंत पोहोचण्याचा शिक्षकांचा उद्देश पूर्ण होण्यास मदत झाली.

अशा पद्धतीने या उपक्रमाचा फायदा विद्यार्थी, पालक व शिक्षक असा त्रिकोण साधण्यास मदत झाली.

# नवोक्रमाचे नियोजन -

परिसरातील विविध फुले, प्राणी, पक्षी, फळे इत्यादी गोष्टींची ओळख करून देताना फळे ही महत्वपूर्ण कशी आहेत. त्यांचे उपयोग काय? त्या फळांचे रंग, चव काशी असते? या विषयी माहिती मुलांना देण्यासाठी मुद्दामच हा नवोपक्रम निवडला.

फळांचा उपयोग करून भाषा विषयाशी संबधित पुढील संकल्पना स्पष्ट करता येतील.

यामध्ये: **फळांची नावे,फळांची ओळख,फळांचा रंग** यांचा समावेश होतो.

रंगांची नावे, फळांचे वर्णन करणे, फळांचे चित्र पाहून नाव सांगणे, फळांच्या नावावरून बडबडगीत म्हणणे, फळे ज्या ठिकाणी जास्त पिकतात त्या गावांची बडबडगीतातून ओळख करून देणे. त्या फळांमधील एक बी-अनेक बीया असे गट करून शिकवणे. संगीत खुर्चीच्या सहाय्याने फळांचे खेळ खेळणे. भौमितिक आकारांची ओळख खेळातून करणे, गोलावर पळता पळता फळ ओळखून हातात घेणे. फळांमधील लहान मोठेपणा ओळखायला शिकवणे, सोलून-चिरून खायची फळे, झाडावर व वेळीवर येणारी फळे, चित्र जोड्या लावणे इत्यादी फळांची तोंडओळख करून देण्यासाठी मुलांना घरी वेगवेगळ्या फळांची चित्रे रंगवण्यास सांगितले. त्यामुळे मुलांनी विविध फळे रंगवून सुंदर चित्र संग्रह तयार केला.

लहान मुले ही देशाची भावी पिढी असल्यामुळे त्यांच्या बौद्धिक व शारिरीक विकासावर भर देता देता त्यांचा भावनिक सामाजिक विकास होणे गरजेचे आहे. या विचारांनी प्रेरीत होऊन खेळाच्या माध्यमातून या नवोपक्रमाचे नियोजन केले.

सध्या कोरोनाच्या काळामध्ये शाळा पुर्णपणे बंद आहेत. अश्यापरिस्थितीमध्ये या वयोगटातील मुलांचा विचार करून (ऑनलाइन) अशाप्रकारच्या उपक्रमाची निवड केली.

## ४-१. उपक्रमपुर्व स्थितीचे निरीक्षण

१. पालकांची लहान मुलांच्या शिक्षणविषयी संभ्रमवस्था
२. खेळांद्वारे माहिती करून देण्यासाठी काही पालकांना वेळ नाही हे दिसून आले
३. शाळा बंद असल्यामुळे शिक्षण देणे सहज शक्य नव्हते

४. ह्या वयाची मुले वाचन लेखन करू शकत नाहीत परंतु पाहणे, ऐकणे, व बोलणे या क्रियांच्या सहाय्याने सहज शिकतात

५. नियोजन

❖ सर्व शिक्षकांना ऑनलाइन पद्धतीने शिक्षण देण्याचे प्रशिक्षण देण्यात आले

❖ पालकसभा (ऑनलाइन) घेऊन पाल्यांना ऑनलाइन शिक्षण कसे देणार याविषयी माहिती दिली वेळा ठरविल्या

❖ ऑनलाइन शिक्षणाप्द्धतीसाठी खालील मुद्यांचा विचार केला

- प्रथम पालकांचे ग्रुप तयार केले - सर्व सूचना ऑडिओ विडिओ द्वारे पालकांपर्यंत पोहोचवल्या. छोटा मोठा गट, वार व विषयानुरूप वेळापत्रक तयार केले (मुक्तांगण - ३० मिनिटे आठवड्यातून ३ दिवस, छोटगट- ४५ मिनिटे आठवड्यातून ४ दिवस, मोठा गट ६० मिनिटे आठवड्यातून ४ दिवस)
- दैनंदिन प्रार्थना, भजन श्लोक इत्यादीचे पाठांतर.
- चित्रतक्ते गाण्यासहित व सखोल महितीसाहित तयार केले. ( फळे-फुले, पालेभाज्या व फळभाज्या, प्राणी व पक्षी)

सर्व गोष्टी समजवण्यासाठी माध्यम म्हणून खेळांचा वापर करण्याचे ठरविले.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून मी स्वता: विविध खेळप्रकारातून फळांविषयी सखोल माहिती देण्यासाठी नियोजन केले.

**४-२. संबंधित व्यक्तींशी, तज्ञांशी चर्चा**

- या उपक्रमसंदर्भात कराड विद्याभूषण पुरस्काराने सन्मानित आमच्या शाळेचे शिक्षण प्रकल्प प्रमुख श्री रमेश फणसळकर सर व सौ रेखाताई फणसळकर यांच्याशी चर्चा केली
- शालेयसमितीच्या सदस्या सौ गितांजाली तासे मॅडम यांचे मार्गदर्शन घेतले
- जनकल्याणप्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री राजेंद्र अलोने सर यांचे मार्गदर्शन घेतले
- जनकल्याणप्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यालयाचे पर्यवेक्षक, श्री विजय कुलकर्णी नेशन बिल्डर, आदर्श शिक्षक व नवोपक्रम २०१९-२० चे राज्यस्तरीय द्वितीय क्रमांक पुरस्कार प्राप्त ह्यांचेही मार्गदर्शन झाले
- तांत्रिक मार्गदर्शनासाठी जनकल्याणप्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यालयाच्या आयटी तंत्रज्ञान व माहिती विभाग प्रमुख सौ अबोली फणसळकर यांचे मार्गदर्शन घेतले
- कराड नगर परिषद शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी माननीय जमीला मुलाणी मॅडमनी मार्गदर्शन केले

प्रत्यक्ष प्रकल्प राबवताना मला ताराबाई मोडक (शिक्षणतज्ञ) तसेच अनुताई वाघ (शिक्षणतज्ञ) यांच्या लिहलेल्या पुस्तक वाचनातून प्रेरणा मिळाली.

# ऋणनिर्देश

१. जनकल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष,  श्री शिरीष गोडबोले सी ए

२. उपाध्यक्ष श्री तुकाराम चव्हाण

३. सचिव श्री अनिल कुलकर्णी

४. संचालिका सौ स्वातिताई भागवत,जनकल्याण प्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यामंदिर

५. मुख्याध्यापिका सौ. रूपाली तोडकर.

६. कार्यालयीन सहकारी श्री महेंद्र जोशी व सागर जोशी

तसेच हयासोबतच मला माझ्या सहकारी शिक्षकांकडून व शिक्षकपूरक सेवक ह्यांचीही मोलाची मदत झाली.

माझ्या कुटुंबातील माझे यजमान श्री भास्कर माटे व मुलगा श्री कौस्तुभ माटे ह्या दोघांची मौलिक व महत्वपूर्ण मदत झाली.

## ४-३. आवश्यक साधंनांचा विचार

हा उपक्रम योग्यापद्धतीने राबवण्यासाठी आवश्यक व योग्य साधंनांचे नियोजन केले

- मुलांना खेळातून विविधप्रकरची माहिती देण्यासाठी वर्गभिंतीवर विविध तक्ते तयार करून लावले
- चित्र गोष्टी व चित्र पुस्तके ऑनलाइन दाखवली
- फळे-फुले, पालेभाज्या व फळभाज्या (वेलवर्गीय,झुडुपवर्गीय व झाडवर्गीय), प्राणी व पक्षी, विविध सण, वाहनांचे प्रकार, कारागीर व औषधी वनस्पति ई. चित्रतक्ते तयार केले
- वर्गात जमिनीवर विशिष्ठ खेळ आखून घेतले
- सध्या ऑनलाइनच्या कालामध्ये रोज एका वर्गाला प्रत्येक तक्त्यांची खेळाच्या माध्यमातून माहिती दिली
- ह्या शेक्षणिक वर्षात सुरुवातीपासून मुलांना वरीलप्रकारे शिकवण्यास सुरुवात केली
- तंत्रज्ञान- अँड्रॉइड मोबाइल - फुलस्क्रीन - इंटरनेट - झूम/गूगल मीट ऑडिओ-विडियो बद्दल मुलांना व पालकांना माहिती दिली.
- पालकांना मुलांबरोबर उपस्थित राहण्यास अनिवार्य केले.
- खेळांची यादी:
    1. चित्र कोडी: उदा:
       "मी आहे लालम लाल माझ्या बिया आहेत फार, मी कोण?--"
       "मी आहे गोल गोल बाहेरून हिरवा आतून लाल, मी कोण?--"

    २. गाणी: उदा:
       १. "सांगा सांगा लवकर सांगा  एक बी ची फळे सांगा ?"
       २."सांगा सांगा लवकर सांगा  अनेक बीयांची फळे सांगा ?"

    ३. गाणे "ओळख फळांची व ठिकाणांची"

## ४-४. करावयाच्या कृतीचा क्रम

अंदाजे वेळापत्रक तयार केले, जुलै २०२१ ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीसाठी,

जुलै :- सर्व फळांची चित्र कार्ड तयार केली, काही चित्रतक्ते एकत्रीत करून ठेवले.

ऑगस्ट:- चित्र तक्त्यांवरील फळे व काही आपल्या सभोवती मिळणारी फळे एकत्र करून दाखविली व त्यांची माहिती सांगितली

सप्टेंबर : - फळांची ओळख करून देता देता फळांचे वर्गीकरण असे खेळ घेतले उदाहरणार्थ एक बी-अनेक बीया, सोलून खायची फळे-चिरून खायची फळे आणि फळे मोजणे

ऑक्टोबर :- झाडावर येणारी फळे, वेलीवर येणारी फळे, कोणत्या फळाचे कोणत्या प्रदेशात उत्पादन अधिक प्रमाणात घेतले जाते हे सांगितले, विविध फळांची चित्रे रंगविण्यास सांगितले

वरील मुद्द्यांच्या आधारे खेळ खेळण्यास दाखवले, अश्या पद्धतीने खेळातून उमगले शब्दभांडार या नवोपक्रमातून मुलांना सहजतेने फळांविषयी माहिती सांगणे सोपे झाले.

- वर्षभर ऑनलाइन शाळा घेत असल्यामुळे विविध चित्र तक्त्यांची निवड केली.
- हा नवोपक्रम राबवण्यासाठी मोठा गट या वर्गाची निवड केली.
- प्रत्येक विद्यार्थांना हा खेळ खेळण्यासाठी सहभागी करून घेतले.
- या खेळांनुसार पालकांनाही इतर छोटे छोटे चित्र तक्ते तयार करण्यास सांगितले
- तसेच यामध्ये मुलांना प्रत्यक्ष सहभागी करून घेण्यास सांगितले.
- मुलांच्या प्रत्यक्ष सहभागातून तयार केलेल्या विविध चित्र तक्त्यांचे ऑनलाइन वर्गामध्ये परीक्षण केले.
- आठवड्यात सर्व चित्र तक्त्यातून निवड करून त्या तक्त्यातील माहिती इतर विद्यार्थ्यांना समजावून सांगत होते तशीच माहिती पालकांनी आपल्या पाल्यांना सांगावी असे सांगितले.
- खेळ खेळताना चित्र तक्त्यावर चित्रांचे नाव मोठ्या अक्षरात व चित्र सुद्धा मुलांना ओळखू येईल एव्हड्या किंवा त्या चित्राचे आकलन होईल एव्हडा चित्रांचा आकार

निश्चित केला होता. त्यामुळे मुलांना चित्र ओळखून माहिती सांगण्यास मदत झाली.

- ❖ तक्त्यातील चित्र निवडीसाठी रिंग अथवा फास्याचा वापर करण्यास सांगितले आणि निवडलेल्या चित्राची माहिती सांगण्यास सांगितले.
- ❖ या खेळातून विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाची सखोल माहिती मिळण्यास मदत झाली.

## ४-५. उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण

- ❖ प्रत्येक विद्यार्थ्याला खेळायला संधी मिळाल्यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढीस लागला. प्रत्येक खेळामध्ये भाग घेण्यासाठी मुलांना प्रेरणा मिळाली.
- ❖ प्रत्येक मुलांचा खेळांकडे पाहण्याचा, त्या खेळाविषयी माहिती करून घेण्याचा कल वाढला.
- ❖ खेळ कोणताही असला तरीही सर्व वर्ग मित्रांबरोबर खेळामध्ये सहभागी होण्याचा आनंद मुलांना मिळू लागला.
- ❖ घरी असताना अश्या पद्धतीचे खेळ मुले आई-बाबां सोबत खेळू लागली.
- ❖ खेळांमुळे मुलांमध्ये विविध कल्पनांचा विकास होण्यास मदत झाली.
- ❖ मुलांच्या शारिरीक, बौद्धिक क्षमतांचा विकास होण्यास मदत झाली.
- ❖ मुलांच्या मनामध्ये सकारात्मकता वाढीस लागली. त्यामुळे चीड-चीड, राग, नकारात्मकता या गोष्टींकडील कल दूर होण्यास मदत झाली
- ❖ मुले घरी असली तरीही घरामध्ये आई-बाबा, आजी-आजोबा, दादा-ताई यांच्यासोबत खेळण्यासाठी तयार झाली.
- ❖ नकार पचवण्याची मानसिकता निर्माण झाली.
- ❖ अश्या खेळांमुळे कोविड-१९ काळामध्ये घरात रुग्ण असतांनाही मुलांची मानसिकता स्थिर राहण्यास मदत झाली.

## ४.६ - नवोपक्रमाचे नियोजन

हा नवोपक्रम सुरुवात करण्याआधी व्यवस्थित पणे वेळापत्रक तयार केले.

- ❖ शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला विविध छोट्या छोट्या खेळांची यादी तयार केली
- ❖ खेळामध्ये वर्गात व मैदाना वर खेळता येणारे खेळांचे वर्गीकरण केले

- प्रत्येक मुलांना प्रत्येक खेळ खेळण्यास संधि देताना मुलांचे गट तयार केले
- गटाप्रमाणे मुलांना खेळण्यास संधि दिली
- काही विद्यार्थी हे खेळ खेळण्यास मागे राहत होते परंतु त्यांनाही या खेळामध्ये खेळ खेळण्यास प्रथम संधि दिली
- गटागटाने खेळ खेळल्यामुळे प्रत्येक विध्यार्थ्यांना खेळाचा आनंद मिळाला व माहिती मिळाली
- वारंवार असे खेळ खेळण्यास दिले
- खेळ खेळताना मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी सर्वांचे कौतुक केले
- या पध्दतीच्या खेळामुळे मुलांचा शब्दसंग्रह वाढीस लागण्यास व भाषा विकास होण्यासाठी मदत झाली
- ८५% मुलांनी सहज खेळ खेळले हे लक्षात आले
- १५% मुलांना खेळताना थोडी अडचण आली
- १५% मुलांना शाळेत बोलाऊन प्रत्यक्ष खेळ घेतले
- खालील वेळापत्रकानुसार खेळ घेतले

| गट | हजेरी क्रमांक | तारीख | वेळ | दिवस |
|---|---|---|---|---|
| मोठा गट (अबोली) | ०१ ते १५ | १८.१०.२०२१ | ०८.३० ते ०९.१५ | सोमवार |
| | १६ ते ३० | २०.१०.२०२१ | | बुधवार |
| | ३१ ते ४० | २१.१०.२०२१ | | गुरुवार |
| मोठा गट (मोगरा) | ०१ ते १० | २५.१०.२०२१ | ०८.३० ते ०९.१५ | सोमवार |
| | ११ ते २० | २६.१०.२०२१ | | मंगळवार |

**४.७ - उपक्रमांसाठी ईतरांची मदत**

या उपक्रमासाठी विद्यार्थी, पालक, सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मदत झाली

<u>विद्यार्थ्याचेकडून सहकार्य</u>

- ❖ शिकवत असताना स्क्रींनसमोर शांततेने बसत होती
- ❖ शिकवत असलेले खेळ लक्षपूर्वक पाहकत होती
- ❖ ह्या खेलरूपी शिक्षणात न समाजल्यास प्रश्न विचारात होती

<u>पालकांचे सहकार्य</u>

- ❖ वेळातवेळ काढून पालक रोज ३० मिनिटे पाल्याबरोबर ह्या ऑनलाइन शिक्षणासाठी वेळ देत होते
- ❖ खेळातील एखादाभाग मुलांना समाजाला नाही तर तो भाग पुन्हा समजाऊन सांगत होते
- ❖ ह्या खेळांच्या माध्यमातून पालकांनीसुद्धा विविध खेळांचे चित्रतक्ते तयार केले
- ❖ हयातून मुलांना व पालकांना ऑनलाइन शिक्षणामध्ये सहजता व आनंद , नावीन्य वाटू लागले

<u>शिक्षकांचे सहकार्य</u>

- ❖ खेळ कसे खेळायचे हे दाखवताना मोबाइल ऑपरेशन विविध प्रकरानी सहकारी शिक्षकांनी केले
- ❖ विविध चित्रतक्ते बनविताना विविध कल्पना/सूचना दिल्या
- ❖ माझ्याबरोबरच सहकारी शिक्षकांनीसुद्धा ह्याच प्रमाणे ही कल्पना पुढे चालू ठेवली

**४.८ - उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे -**

ऑनलाइन पद्धतीने मी विविध प्रकारची माहिती सांगू शकते हे मला ज्ञात होते. परंतु कमीतकमी वेळात जास्तीतजास्त माहिती कशी देता येईल जेणे करून स्क्रीन वापर कमीतकमी होईल. छोट्या मुलांना खेळाची आवड असते व त्यातून मुले सहज शिकतील. वरील गोष्टींचा विचार करून शैक्षणिक खेळांची निवड केली. हे सर्व करताना मुलांच्या वयाचा विचार प्रकर्षाने लक्षात ठेवला.

- फळे-फुले, पालेभाज्या व फळभाज्या, प्राणी व पक्षी, औषधी वनस्पति, नेते, कारागीर, सण, ईत्यादी छोट्या छोट्या खेलरूपी चित्रतक्ते बनवले
- सध्या कोविड परिस्थितीचा विचार केला. मुलांच्या शाररिक आरोग्याच्या दृष्टीने फळांची उपयुक्तता हयच्या चित्रतक्त्यांवर लक्ष केन्द्रित केले.
- मुलांनी सर्व प्रकारची फळे खावीत कारण त्यांचे फायदे मुलांना व्हावेत ह्यासाठी फळे ह्या चित्रतक्ता प्रकारची निवड केली.
- वर्गात शिकवताना चित्रतक्यांच्या सहय्याने फळांचे महत्व संगितले.
- ह्यामध्ये बिन बिया, एक बी व अनेक बिया तसेच चिरून व सोलून खायची फळे ह्यांचे महत्व चित्र तक्ता माध्यमातून सांगितले .

# अभिप्राय:-

## पालकांचे अभिप्राय:-

सौ. माटे बाईंनी मोगरा मोठा गट या वर्गामध्ये बाईंनी फळांचा खेळ शिकवला. या खेळामध्ये बाईंनी एक बी अनेक बी असणारी फळे यामधील फरक सांगितला. आणि कोणते फळ सोलून खायचे आणि कोणते फळ चिरून खायचे असते. हे सांगितले. आणि हे खेळामधून शिकवले त्यामुळे मुलांना खूप आवडल आणि जर अशाप्रकारे मुलांना खेळामधून शिकवले तर जास्त लक्षात येते. आणि बाईंनी हा खेळ खूप छान प्रकारे घेतला आणि माझ्या मुलीला तर हा खेळ खूप आवडला. आणि असेच जर खेळातून शिकवले तर आवडेल मुलांना.

धन्यवाद.

आपली विश्वासू

R.P.Jadhav.

---

April 2020

26

WK 17 (117-249) • Sunday

मी आशिता गरुड ची आई आहे. ती आमोली मोठ्या गटात आहे. फळांची माहिती या विषयावर माटे बाईंचा एक लेसन झाला होता. तर त्या लेसनमध्ये माटे बाईंनी फळांचं एक गाणं शिकवलं. त्यामध्ये कुठलं फळ कुठे पिकतात, उदा. वसईची केळी, नाशिकची द्राक्षे यावर आधारीत ते गाणं होतं. त्यानंतर एक बी असलेली फळे व अनेक बीया असलेली फळे कोणती हे सांगितले. तसेच सोलून खाणारी व कापून खाणारी फळे कोणती हे ही त्या त्या फळांची चित्रे दाखवून समजावून सांगितले. अशा प्रकारे माटे बाईंनी मुलांना खूप छान प्रकारे फळांची माहिती हा लेसन समजावून सांगितला. त्यामुळे जेव्हा फळांची माहिती या विषयावर परिक्षेत प्रश्न विचारला गेला, तेव्हा आशिता ने व्यवस्थीत उत्तरे दिली. तसेच फळांची चित्रे दाखवून समजवल्या-मुळे मुलांना ही कोणतं फळ दिसायला कसं असतं हे लक्षात आले.

सौ. ज्योती आनंद गरुड

[signature]

| APRIL | | | | | | 2020 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| WK | M | T | W | T | F | S | S |
| 14 | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 15 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 16 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 17 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 18 | 27 | 28 | 29 | 30 | | | |

## अभिप्राय

नमस्कार,

मी रोहिणी उमेश यादव मी शौर्य उमेश यादव ची आई आमच्या पाल्यास आपण फळे, फुले, आदि यांच्या संदर्भात खुप छान समजून सांगितली या माहितीमुळे, आमच्या पाल्यास फळा संदर्भातील प्रकार समजले कोणते फळ कसे खायचे ते कोणत्या प्रकारे आकारावर येते; ते फळ कसे खायच सोलून की चिरुन त्याच्यात किती बिया असतात कोणत्या फळात बिया नसतात; हि सर्व माहिती तुम्ही आमच्या पाल्यांना ऑन लाईन पद्धतीने खुप छान समजून सांगितली. कोणते फळ खाल्यामुळे आपल्याला कोणकोणते फायदे होतात ते तुम्ही खुप छान पद्धतीने मुलांन पर्यंत पोहचवले. आणि आमच्या पाल्यांना एक नवीन प्रकारच्या खेळही शिकवला. तो तक्ता तयार करून, रिंग त्या फळांवर टाकून मुलांना छान प्रश्न विचारले त्यांना त्यातून फळांविषयी माहिती मिळालीच पण हसत-खेळत अभ्यास पण झाला आणि नवीन खेळ पण खेळायला शिकले. सौ. माटे मॅडम यांनी मुलांना खुप छान सोप्या, अशा शब्दांत मुलांना माहिती सांगितली त्याबद्दल त्यांचे मनपूर्वक आभार. मॅडमच्या या कल्पनेमुळे आम्ही मुलांना घरी प्राणी, पक्षी फुले, गाड्या यांचे तक्ते तयार करून मुलांना जास्त माहिती देऊ शकतो.

सौ. मुख्याध्यापिका. माटे. बाई यांचे मी मनापासून पुनश्च: आभारी आहे. धन्यवाद बाई

आपली विश्वासू
सौ. रोहिणी उमेश यादव
[signature]

---

दि:२८/१०/२०२१


मा. मुख्याध्यापिका,
सप्रेम नमस्कार.

माझा मुलगा कु. ध्रुवतेज तुषार थोरात हा सरस्वती शिशुवाटिका, मंगळवार पेठ, कराड या शाळेत "मोगरा" मोठ्या गटात शिकत आहे तरि शाळेत अनेक उपक्रम घेतले जातात. त्यापैकी मुख्याध्यापिका मा. सौ. शरयू माटे बाई यांनी एक फळांचा लेसन घेतला त्यामध्ये अनेक फळ दाखवली व फळांवर रिंग टाकून ते फळ ओळखायला सांगितले. तसेच अनेक बिया व एक बी असणारे फळ ओळखायला सांगितले, सोलून खायची फळ व चिरून खायची फळं यातील फरक मुलांना समजावून सांगितला या पद्धतीने शिकवले तर ते मुलांना खूप आवडते व लक्षातही चांगल्या पद्धतीने राहते कारण फक्त तोंडी सांगितले तर ते लवकर विसरण्याची शक्यता असते. पण अशा पद्धतीने लेसन घेतले तर मुलांना ते खूपच आवडते ते त्यात एकाग्र होतात अशाच पद्धतीने इतरही लेसन घेतले,

उदा :- रंग, भाज्या, आकार व खेळ हे मुलांना जास्त आवडेल.

सरस्वती विद्यामंदिर या शाळेत मुख्याध्यापिका मा. सौ. शरयू माटे बाई अशा पद्धतीने अनेक उपक्रम घेत आहेत. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद!

मंजुषा थोरात
आपली विश्वासू
सौ. मंजुषा तुषार थोरात.



# अभिप्राय

मी सौ. स्वाती प्रदीप जाधव माझी मुलगी कु. शुभ्रा प्रदीप जाधव सरस्वती शिशुवाटिकेत लहान गटात शिक्षण घेत असून मागील आठवड्यात शाळेच्या मा. मुख्याध्यापिका सौ. माटे बाई यांनी मुलांचा मनोरंजक, पण ज्ञानवर्धक खेळ घेतला. तो खूपच छान होता त्यांनी तक्त्यावर विविध फळांची चित्रे काढलेली होती आणि ठोकळ्याच्या साहाय्याने हा खेळ घेतला. ठोकळा ज्या फळाच्या चित्रावर पडेल त्याविषयी एका - एका विदयार्थ्यांना त्यांनी प्रश्न विचारले आणि शेवटी स्वतःही माहिती सांगितली या खेळामुळे मुलांना फळाचे नाव, रंग महत्त्व तर कळालेच आणि खेळाचा आनंदही आला ..... पालकांनाही याप्रमाणे आपण मुलांसाठी पक्षी, प्राणी, फुले यांचे तक्ते करुन घरच्या घरी मुलांचे खेळ घेऊन त्यांच्या ज्ञानात भर पाडू शकतो. याची जाणिव झाली तेव्हा बाईंचे, मनःपूर्वक आभार !

धन्यवाद

## शिक्षकांचे अभिप्राय:

Page No.
Date : / /

सौ. सुचित्रा शाळगावकर (सहशिक्षिका)

ऑनलाईन संकल्पनाच हीच मुळात खूप क्लिष्ट आहे असे असताना देखील आमच्या शाळेतील शिशुवाटिकेच्या मुख्याध्यापिका सौ. माटे बाई यांनी मुलांना मोठ्या गटातील मुलांना गमती जमती मधून खेळ खेळत एक बी अनेक बीयांची माहिती देत छान असा ऑनलाईन लेसन घेतला यामध्ये त्यांनी सुरवातीला मुलांना प्राथमिक स्वरुपात मोगरा मोठ्या गटातील मुलांना फळांची ओळख करुन दिली त्यानंतर पाच पाच मुलांचे गट करुन ती फळे मुलांच्या कडून छान पद्धतीने विचारुन घेतली नंतर त्याहीमधून त्यांनी एक बी ची फळे कोणती व अनेक बियांची फळे कोणती विचारली. मुलांनीही छान प्रतिसाद दिला.

त्यानंतर त्यांनी याच फळांवर आधारित खेळ घेतले. यामध्ये त्यांनी मुलांना एक बी व अनेक बियांची फळे असा खेळ घेतला. त्यानंतर चिरुन खायची फळे कोणती व सोलून खायची फळे कोणती याची ही माहिती सांगितली. त्यानंतर अजून एक खेळ घेतला त्यामध्ये बाईंनी ग्रुप प्रमाणे एक बीचे फळ व अनेक बीयांचे एक फळ अशी दोन फळे एकत्र दाखवून असा एक खेळ घेतला. यामधून मुलांना सर्व फळांची छान ओळख झाली सर्व फळे छान समजली बाईंनी खूपच छान प्रकारे हे खेळ घेतल्यामुळे मुले ही त्याचा आनंद घेऊ शकली येवढेच नाही तर त्याच्या माध्यमातून मुले फळे खायला तर शिकलीच व आपल्या घरी आपल्या भाव-बहिणी बरोबर वेगवेगळे खेळ खेळायला शिकली.

खरोखरच सौ. माटे बाईंनी घेतलेला हा लेसन खूप छान प्रकारे मुलांना समजला. ज्या मुलांना समजले नाही त्यांनी बाईंनी प्रत्यक्ष शाळेत बोलवूनही त्यांचे अशाच प्रकारे खेळ घेतले. हे खेळ खेळताना मुलांना खूप छान वाटले मुले या खेळामध्ये खूप छान रमली व यातून मुलांना फळाविषयी आवड निर्माण झाली. बाईंनी ज्या पद्धतीने मुलांना सांगितले त्यामुळे एखादे [illegible] ते ही खायला

OPPO Reno6 5G © Kaustubh Mate

Page No.
Date : / /

लागेल असे मला वाटते.

खरंच बाईंनी खूप छान लेसन घेतला त्यामुळे आम्हाला ही बाईंच्या कडून खूप काही शिकला आले व एक वेगळी प्रेरणा ही मिळाली.

धन्यवाद बाई खूपच छान

सौ. माधुरी जीवन कांबळे (सहशिक्षिका)

नमस्कार,

ऑनलाईन शिक्षण हे सुरुवातीला सगळ्यानांच खूप अवघड वाटत होता. परंतु यावर मात करीत सर्वांनी ऑनलाईन शिक्षण आत्मसात केले. मुलांना ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी तयार केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. माटे बाई यांनी भाषा विकास कसा साधता येईल व मुलांच्या शब्दसंग्रहात कशा पध्दतीने वाढ होईल यासाठी फळांचा लेसन घेतला पहिल्या टप्यात त्यांची नावे व फळांचा रंग सांगितला नंतर ते फळे व चित्रे दाखवली नंतर ती फळे कशा पध्दतीने खातो? हे समजावले. नंतर एक बी ची अनेक बी ची फळे सांगितली व त्यांच्या वरुन चार्ट तयार करुन त्यावर खेळ घेतला हा खेळ मुलांना फार आवडला. व मुलांनी घरी तो चार्ट बनवून घेऊन त्यावर आपल्या बहिण-भावा सोबत खेळतात. या खेळातून प्रेरित होऊन काही पालकांनी वेलीवर येणारी फळे व झाडावर येणारी फळे असे चार्ट करुन खेळ घेतले. सौ. माटे बाई यांच्या या लेसन मुळे आम्हांला हि कल्पना सुचत गेल्या

आम्ही हि वेगवेगळे चार्ट तयार करुन ऑनलाईन खेळ घेऊ शकलो. जसे कि. पाळीव प्राणी व जंगली प्राणी औषधी वनस्पती व साध्या वनस्पती अशा प्रकारे अनेक खेळ घेऊन मुलांच्या शब्दसंग्रहात वाढ झाली. व ~~आमच्या~~ मुलांनी तोंडी परीक्षेमध्ये छान उत्तरे हि दिली.

अशा पध्दतीने सौ. माटे बाईनी छानच लेसन घेतला. आम्हाला हि नेहमी बाई प्रेरीत करीत असतात. व नवनविन उपक्रम घेत असतात. धन्यवाद बाई.

# ५. नवोपक्रमाची कार्यपद्धती:

### ५.१ पुर्वस्थितीची निरीक्षणे व त्याच्या नोंदी

या उपक्रमामध्ये मुलांचा व पालकांचासहभाग घेण्यासाठी प्रथम सहजच एक खेळ खेळून दाखवला. मुलांना हा खेळ खूपच आवडला. यानंतर मुलांना या खेळातून आनंद मिळाल्याने मुलांनी अश्याप्रकारचे आणखी नवीन खेळ खेळण्यास उत्सुकता दाखविली

. पालकांमध्ये अश्या प्रकारच्या खेळांबद्दल उत्सुकता वाढिस लागली.

- ❖ ऑनलाइन खेळ घेण्यासाठी मी प्रथम फळांच्या चित्र तक्त्यांची निवड केली.
- ❖ मुले विविध फळे खात होती पण फळांची माहिती सांगता येत नव्हती उदा फळ कसे खायचे, फळाची चव तसेच फळाच्या आकारातील लहान मोठेपणा इत्यादी.
- ❖ मुलांना फळांच्या उपयोगाबद्दल माहिती नव्हती
- ❖ मुलांना झाडावर किंवा वेलीवर येणाऱ्या फळांबद्दल माहिती नव्हती.
- ❖ हा खेळ पुन्हा पुन्हा घेण्याची गरज आहे असे लक्षात आले.

### ५.२ कार्यवाही दरम्यान निरीक्षण व माहिती संकलन

- ❖ ऑनलाइन शिक्षणामध्ये मुले सुरक्षित घरी राहून खेळाच्या माध्यमातून अभ्यास करत होती.
- ❖ मुलांच्यामध्ये खेळकर प्रवृत्ती असल्यामुळे मुले आवडीने व लक्षपूर्वक हे खेळ खेळत होती.
- ❖ या पद्धतीच्या खेळांमधून मुलांचा भाषाविकास होण्यास मदत झाली.
- ❖ शब्दसंग्रहामध्ये नवीन शब्दांची वाढ होऊ लागली
- ❖ नवनवीन फळे, त्या फळांची नावे, चव , आकार, लहान मोठेपणा इत्यादी माहिती होण्यास मदत झाली.
- ❖ मुलांच्या भाषा कौशल्यामध्ये इतर फळांची माहिती वाढीस लागली.
- ❖ मुलांनी प्रत्यक्ष सहभाग घेतल्यामुळे प्रत्येकजण बोलू लागली, सहभाग घेऊ लागली.
- ❖ गाण्याच्या माध्यमातून खेळ घेतल्यामुळे मुलांना विषय सहज समजला.

उदा:-

१. सांगा सांगा पटकन सांगा एक बीचे फळ सांगा?

सांगा सांगा पटकन सांगा अनेक बीयांचे फळ सांगा?

यासाठी फळे हातात धरून दाखवून वरील खेळाच्या आधारे विचारत होते.

२. चला चला पळा पळा चला चला रे ....

फळांच्या नावांच्या आधारे फळांची ओळख करून घेतली.

- ❖ ज्या विद्यार्थ्यांना हा खेळ ऑनलाइन पद्धतीने समजण्यास अडथळे आले त्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रत्यक्ष बोलावून खेळ घेतले व समजून दिले.
- ❖ हा उपक्रम पुढील खेळांतून राबविला

१. संगीत खुर्ची

२. वर्तुळामध्ये फळांची मांडणी करून गाण्यांच्या माध्यमातून फळे ओळखण्यास सांगितले

३. भौमितिक आकारामध्ये फळे ठेवून कोड्यांच्या साहहयाने फळे ओळखणे.

४. संगीत कोड्याच्या माध्यमातून फळांची प्रसिद्ध ठिकाणे समजावून दिली.

अश्या पद्धतीने खेळांची रचना करून मुलांना हा भाग समजावून दिला.

## ५.३ उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व त्याच्या नोंदी

**निरीक्षणे:-**

- ❖ खेळातून विविध प्रकारे वर्गीकरण करून मुलांना समजावले असता प्रत्येक घटक त्यांना व्यवस्थितपणे समजला हे लक्षात आले.
- ❖ प्रत्येक खेळ वारंवार खेळल्यामुळे मुलांमध्ये खेळाचे दृढीकरण झाले.
- ❖ सर्वच मुलांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण झाली
- ❖ खेळातून मुलांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळाली
- ❖ मुलांना खेळ खेळताना प्रेरणा मिळाली, त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला.
- ❖ मुले आता नवीन खेळ खेळण्यास प्रवृत्त झाली व इतर मुलांसोबत खेळ खेळू झाली.

- विविध वाहने, विविध पक्षी, विविध प्राणी, विविध फुले, औषधी वनस्पती, लहान-मोठी झाडे, पक्षी-प्राणी यांची घरे याविषयी ज्ञान जाणून घेण्यास तयार झाली.
- या खेळांमधून फळांमधील लहान-मोठेपणा असा फरक मुले सांगू लागली उदा:- आंबा-फणस, पेरु-पपई इत्यादी.
- मुले फळांची संख्या मोजू लागली, सहजपणे गणनक्रियाही आत्मसात होण्यास मदत झाली.
- एक बी - अनेक बिया हा फरक मुले सांगू लागली.

**नोंदी:-**

- या उपक्रमामुळे मुले कंटाळा न करता खेळामध्ये भाग घेऊ लागली
- या उपक्रमामुळे खूप मुलांनी चित्र तक्ते पालकांच्या साहहयाने तयार केले.
- चित्र तक्त्यांच्या साहहयाने खेळ खेळतानाचे विडियो करून बाईंना पाठविले.
- पालकही मुलांसोबत खेळ खेळू लागले
- फळांविषयी आवड निर्माण होऊन जी मुले फळे खात नव्हती ती फळे खाऊ लागली
- पाठाच्या वेळी पालकांनी सांगितले मुलांमध्ये चौकस वृत्ती वाढीस लागली आहे. घरी कोणतेही फळ आणले की ते कसे खायचे, त्या फळाचे फायदे कोणते आहेत हे माहीत झाल्यामुळे मुले आता फळे खाऊ लागली आहेत.


**५.४ नवोपक्रमात आलेल्या अडचणी**

३ ते ६ या वयोगटातील मुलांना शाळा बंद असल्यामुळे शिक्षण कश्या पद्धतीने द्यावे या संभ्रमामध्ये होते. नुसते ऑडिओ-विडियो पाठवून शिक्षणाचे काम पूर्ण होणार नाही व मुलांपर्यंत पोहचू शकणार हे दिसून आले.

- ❖ ऑनलाइन शिक्षण पद्धतीमध्ये शिकवत असताना मुले प्रत्यक्ष समोर नव्हती.
- ❖ गाणी व खेळ घेताना मुलांमधील आवड-निवड यामध्ये फरक होता.
- ❖ पाठ घेताना गाणी वा गोष्टी मुलांच्या लक्षात आले आहेत किंवा नाही हे समजण्यास वेळ जात होता.
- ❖ ऑनलाइन पद्धतीमध्ये खेळ खेळताना प्रत्येक विद्यार्थ्याला वेगवेगळ्या पद्धतीने खेळ समजावून द्यावा लागत होता.
- ❖ ऑनलाइन खेळ खेळत असताना मला दुसऱ्या शिक्षकेची मदत घ्यावी लागत होती.

  उदा: मोबाइल योग्य रीतीने धरून चित्र तक्त्यातील फळे व्यवस्थित दिसून येण्यासाठी.
- ❖ मुलांना खेळामध्ये प्रत्यक्ष सहभागी होता आले नाही.
- ❖ ज्या विद्यार्थ्यांना नेटवर्कमध्ये अडचणी निर्माण होत होत्या त्यांना ऑनलाइन खेळामध्ये सहभागी होता आले नाही.
- ❖ काही मुलांना प्रत्यक्षात खेळ खेळणे आवडत होते, परंतु ऑनलाइन पद्धतीमध्ये हे खेळ खेळणे अवघड वाटत होते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाची कमतरता होती.
- ❖ यामुळे ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन खेळामध्ये भाग घेता आला नाही त्या विद्यार्थ्यांना शाळेमध्ये प्रत्यक्ष बोलावून खेळ घेण्याचे नियोजन करावे लागले.

### ५.५ माहितीचे विश्लेषण:- आलेख, तक्ते



## नवोपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ति (उद्दिष्ठानुसार )

- सद्य परिस्थितीत एक संकट दोन अर्थाने सर्वांना शिकवून जाते. मार्ग शोधणे. कोणत्याही बिकट परिस्थितीला नेटाने व धाडसाने सामोरे जाण्याची विध्यार्थ्यांची तयारी झाली.
- ऑनलाइन अभ्यासक्रमासाठी पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, त्यामुळे एका वेगळ्या प्रकारचे नावीन्य निर्माण झाले
- खेळातून शिकवल्यामुळे विद्यार्थ्यामध्ये आवड निर्माण झाली.
- फळांविषयी सखोल ज्ञान देता आले - फळांचे नाव, लहान मोठेपणा, एक बी, अनेक बिया, सोलून व चिरून, सालीसकट व साल काढून, झाडावर येणारी व वेलीवर येणारी, रंग, उपयोग व फळ कोणत्या प्रदेशात जास्त प्रमाणात पिकते ईत्यादी विषयी मुले सांगू लागली.
- खेळातून मुलांचा शब्दसंग्रह वाढला. विविध फळांची नावे व माहिती मुलांना समजली.
- या खेळामध्ये प्रत्येक विध्यार्थ्याला संधि मिळाली. त्यामुळे विध्यार्थ्यांना विविध खेळ खेळांयची आवड निर्माण झाली.
- खेळ खेळल्यामुळे आनंदी राहू लागली व त्यात जास्तीतजास्त सहभाग घेऊ लागली.
- फळे खाण्याकडे मुलांचं कल वधू लागला.
- शाररिक व मानसिक आरोग्य उत्तम राहण्याच्या धृष्टीने मी राबवलेला उपक्रम मुलांच्या सर्वांगीण वाढीसाठी पूरक व उपयुक्त ठरू लागला. नवोपक्रम राबवताना मुलांनी विविध खेळ खेळणे, खेळानविषयी माहिती समजून घेणे ही उद्धिष्टे पूर्णत्वास गेल्याचा आनंद वाटला. हा नवोपक्रम पुढील मार्गदर्शनासाठी व नविनतेने शिकवण्यास उपयुक्त ठरेल, या समाधानाने मन समाधानी झाले.

# समारोप

शाळा ही बाग आहे, लहान मुले ही छोट्या रोपांप्रमाणे असतात. शिक्षक बागेतील माळी आहेत. या छोट्या रोपरूपी मुलांची सर्वस्वी काळजी घेऊन सर्वांगीण निकोप वाढीसाठी योग्य पद्धतीने उपाय योजना करत त्यांना अभ्यासक्रम समजाऊन दिल्यास ती पुढे ज्ञानरूपी वृक्ष तयार होतील व आपल्या ज्ञानाची ईतरांना सावली देत राहतील.

३ ते ६ वयोगटातील मुलांचा खेलरूपी विकास घडविण्यासाठी विधयार्थीदशेत विषयांची गोडि लागणे फार महत्वाचे आहे. ह्यासाठी विविध प्रयत्न केले जातात. मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व मन आनदीत ठेवण्यासाठी विविध खेळ प्रकार घेणे उपयुक्त आहे असे मला वाटते.

संस्कार प्रदानाचे कार्य घरी, समाजात व शाळेत चालू असते. असे संस्कारक्षम शिक्षण, पध्दतशीर व शिस्तबद्ध रीतीने मुलांवर करण्यासाठी शाळेची (शिशुवाटीकेची) निर्मिती केली आहे. घरांप्रमाणेच शाळेत आल्यावर मुलांनी शिकावे हा ऊद्देश त्यामागे आहे. मुलांना खेळातून शिक्षण देताना भाषा विकास घडविण्यासाठी केलेला हा छोटासा वेगळा प्रयत्न. या वयोगटातील मुलांना अनौपचारीक पद्धतीने शिक्षण देऊन त्यांच्या ज्ञानामध्ये वाढ करण्याचे ठरविले तर मुले विविध कल्पनांद्वारे खेळ खेळत असतात हे बऱ्याच वेळा निरीक्षणातून समोर आले आहे. यानुसार या मुलांना लेखन वाचन येत नाही, त्यामुळे त्यांना खेळ प्रकारातून वैशिष्ठपूर्णतेने शिकविता येते व या शिक्षणातून मुले खूप चांगल्या पद्धतीने शिकतात. ह्या ज्ञानाचा उपयोग त्यांना संपूर्ण जीवनामध्ये होतो म्हणून या उपक्रमाद्वारे मुलांना सहजतेने शिकता येते याचा अनुभव मुलांना देण्यासाठी प्रयत्न केला. अध्ययन व अध्यापन या प्रक्रिया एकमेकांशी निगडीत आहेत. यशस्वी अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान होणे आणि त्यांची आकलन शक्ती वाढणे व त्याच्या प्रतिसादातून नवीन अध्यापनाला गती मिळणे. या सर्व गोष्टी विद्यार्थी शिकला आहे हे त्याच्या वर्तनात दिसून येते.

जे समजले नव्हते ते समजले व जे करता येत नव्हते ते करता येऊ लागले म्हणजे शिक्षण झाले असे मला वाटते. अध्ययन म्हणजे संस्कार ग्रहण आणि वर्तमान परिवर्तन व ते घडवण्यासाठी सहाय्य करणे म्हणजे अध्यापन होय. विद्यार्थ्यांवर

होणाऱ्या संस्कारात शिक्षकांचा वाटा मोठा असतो, शिक्षकांच्या आचार-विचारांचा प्रभाव संस्कारक्षम विद्यार्थ्यांवर होत असतो,प्राचीन काळी गुरूंची योग्यता मोठी मानली जाई. त्यामुळेच प्राचीन काळातील आचार्य सदाचार संपन्न व शीलसंपन्न राहत होते

अध्यापकांची प्रतिष्ठा त्यांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते, ही गुणवत्ता चार क्षेत्रामध्ये मानण्यात येते. ते पुढीलप्रमाणे

- जे विषय शिकवायचे त्यावर उत्तम प्रभुत्व
- विषय समजावून देण्याचे कौशल्य
- सतत स्वतःचा व्यासंग अद्यावत ठेवण्यासाठी प्रयत्नशील
- अध्यापन साधनांचे ज्ञान व त्यांचा कौशल्यपूर्ण उपयोग करण्याचे सामर्थ्य

या सर्व बाबी शिक्षकांमध्ये असणे गरजेचे असते. "**खेळातून उमगले शब्द भांडार**" या उपक्रमातून मी या सर्व गोष्टींचा उपयोग करू शकले, असे मला वाटते.

# संदर्भसूची

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १. | सारं काही मुलांसाठी | शोभा भागवत |
| २. | बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण अभ्यासक्रम | शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर |
| ३. | आता शाळेत जायचं | रेणु दांडेकर |
| ४. | मुलं शाळेत जाण्यापूर्वी | आशा परूळेकर |
| ५. | गोष्टी सांगणार यासाठी चार गोष्टी | ताराबाई मोडक |
| ६. | मेंदू संशोधन व बालशिक्षण | आदिती नातू व प्रेरणा वाळिंबे |

# परिशिष्ट

थोर शिक्षणतज्ञ फ्रोबेल, रुसो, गिजुभाई बधेका, अनुताई वाघ-ताराबाई मोडक या सर्वांनी शून्य ते सहा वयोगटातील मुलांना योग्य व उपयुक्त शिक्षण देण्यासाठी आपले विचार मांडले आहेत. सर्वच लहान मुले शिक्षण प्रवाहात येण्यासाठी वेगवेगळे व वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन तज्ञांनी कार्य केले आहे. प्रत्येक मुलाला घरांमध्ये मिळणारे ज्ञान अवतीभोवतीच्या प्रत्येक घटकांचा उपयोग करून दिलेले आहे. शिक्षणासाठी एक प्रकारची चौकट नसावी, आधारभूत शिक्षण अनौपचारीक पद्धतीने दिले जावेअसे त्यांनी सांगितले आहे. या सर्वांनी केलेले कार्य हे मुख्यत्वे वनवासी, वंचित मुलांसाठी होते, परंतु यांची शैक्षणिक विचारधारा डोळ्यांसमोर ठेवून सध्यांच्या शिशूवर्गांसाठी अभ्यासाची संरचना केली तर सर्वच मुलांना सर्वच शिक्षण उपयोगी व संस्कारक्षम ठरेल.